Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# मराठवाडयातील नांदेड जिल्हातंर्गत येणाऱ्या बाभळी बंधारा संदर्भातील पाणी प्रश्नाच्या राजकारणाचा अभ्यास

**प्रा. डॉ. माधव शंकर वाघमारे,** सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, जी. टी. पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार

**प्रस्तावना**

मानवी जीवनात पाण्याचे अनन्यसाधारण महत्व आहे.पाणी अस्तित्वात असेल तर हि जीवसृष्टी अस्तित्वात राहू शकते .पाण्याला हिंदी मध्ये “जल है तो कल है” असे म्हटले जाते. पाण्याबद्दल एच. ऑडेन नावाचे विचारवंत म्हणतात हजारो लोक प्रेमाशिवाय जगले पण एकही पाण्याशिवाय नाही. मानवी संस्कृतीच्या विकासात पाण्याची भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे जागतिक बँकेचे जलतज्ञ श्री फॅकन मार्क यांच्या मते; कोणत्याही राष्ट्राच्या विकासासाठी पाणी या घटकाला प्राधान्य असते. भारताचे ख्यातनाम जलतज्ञ माधवराव चितळे यांनी “पाण्याला जीवन संबोधले आहे” अन्नाशिवाय मनुष्य काही दिवस जगू शकतो.परंतु पाण्याशिवाय माणसाचे अस्तित्व शून्य आहे. मानवी जीवनात पाण्याला सामाजिक ,राजकीय आणि आर्थिक दृष्टीकोनातून महत्त्व आहे. प्रारंभिच्या काळात मनुष्य पिण्यासाठी व स्वत:ची गरज भागविण्यासाठी पाण्याचा वापर करीत असे. पुढे शेतीचा शोध लागल्यानंतर शेतीसाठी पाण्याचा वापर करू लागला. पाण्याचा जस-जसा वापर वाढू लागला तसतसे त्याच्या नियोजनाची गरज भासू लागली. एकीकडे हे नियोजन करताना भौगोलिक सीमेच्या मर्यादेतून देशा-देशात,राज्या-राज्यात व प्रदेशात पाणी वापरावरून, वाटपावरून, कुरघोडी, ताण - तणाव व संघर्ष होऊ लागले. जगामध्ये इ.स.१९१४ ते १९२० या दरम्यान पहिले महायुद्ध झाले. इ.स. १९३९ ते १९४५ काळात दुसरे महायुद्ध झाले तर अनेक विचारवंतानी, शास्त्रज्ञांनी व संशोधकांनी तिसरे महायुद्ध फक्त पाण्यासाठी होईल असे भाकीत केले आहे. ग्रामीण जीवनात शेतकरी उत्पादन प्रक्रिया गतिशील करण्यासाठी पूर्णतः पाण्यावर अवलंबून असतो.आज ग्रामीण भागात शेतकऱ्यासमोर पाण्याचा भयंकर प्रश्न निर्माण होताना दिसत आहे, मराठवाड्यातील नांदेड जिल्हांतर्गत येणाऱ्या बाभळी बंधा-या संदर्भातील पाण्याचा प्रश्न नेहमी महाराष्ट्र व आंध्रप्रदेश राज्यामध्ये चिघळत होता,या बंधाऱ्याच्या पाण्यावरून होणारा संघर्ष हा स्थानिक लोकांपुरता, शेतकऱ्यापुरता मर्यादित न राहता तो विधिमंडळ सर्वोच्च न्यायालयात गेल्यामुळे तो राजकीय केंद्रस्थानी आला.त्यामुळे प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये बाभळी बंधाऱ्याच्या पाणी वाटपासाठी झालेल्या राजकीय संघर्षाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाचा उद्देश**

१. मराठवाड्याच्या नांदेड जिल्हातंर्गत येणाऱ्या बाभळी बंधाऱ्याच्या पाणी प्रश्नाचा अभ्यास करणे.
२. बाभळी बंधाऱ्याच्या पाणी वाटपावरून झालेल्या राजकारणाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके**

१. मराठवाड्याच्या नांदेड जिल्हातंर्गत येणाऱ्या बाभळी बंधाऱ्याच्या पाणी वाटपावरून राजकीय संघर्ष झाला.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

२. बाभळी बंधाऱ्याच्या पाणी वाटपाचा प्रश्न राजकीय बनला होता.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक, विश्लेषनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यासाठी दिव्तीय साधन सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये पुस्तके, संदर्भग्रंथ, विविध वर्तमान पत्रातील लेख, इंटरनेट, इ. आधार घेण्यात आला आहे.

**भारत आणि शेजारील देशातील पाणीसंघर्ष**

भारत हा दक्षिण आशिया खंडातील एक महत्वाचा देश आहे. पाणी वाटप,नदी जोड प्रकल्प यावरून भारताचा शेजारील राष्ट्रासोबत संघर्ष होत राहिला आहे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताची फाळणी झाली या फाळणीतून भारत आणि पाकीस्तान या दोन देशाचा जन्म झाला. या दोन देशांनी जलसंघर्षाचा अनुभव घेतला आहे. या दोन देशांनी संघर्षानंतर संवादाच्या माध्यमातून इ. स. (१९६०) मध्ये सिंधू जल करारावर स्वाक्षरी केली.ज्या कराराने दोन देशाच्या हद्दीतील नद्यांचे स्पष्टपणे विभाजन करण्यात आले. या करारासाठी जागतिक बँकेने मध्यस्थी केली होती. या दोन देशातील सर्वात महत्वाचा व यशस्वी करार म्हणून या कराराकडे बघितले जाते. सिंधू नदीचा उगम तिबेट मधून होतो. ही नदी भारत, पाकिस्तान, चीन आणि अफगाणिस्थान या देशामध्ये वादाचा मुद्दा बनली होती. (१९६०) च्या कराराद्वारे भारताला पूर्वेकडील रवी, बियास सतलज या नद्यावर नियंत्रण मिळाले. कोणतीही अनिष्ट परिस्थिती निर्माण होईपर्यंत पूर्वेकडील नद्यांचे सर्व पाणी भारताच्या अनिर्बंध वापरासाठी उपलब्ध असेल असे स्पष्ट करण्यात आले. भारत नेपाळ जलसंबंधाचा इतिहास दीर्घ राहिला आहे. नेपाळ हा दक्षिण आशियातील एक छोटा भूपरीवेष्टीत देश आहे. ज्याच्या पूर्व, दक्षिण आणि पश्चिमेला भारत आहे आणि उत्तरेला चीनने वेढले आहे. तिबेट मधून उगम पावणाऱ्या सर्व नद्या बंगालच्या उपसागरात जाऊन मिसळतात बांगलादेश मार्गे नेपाळ आणि भारता दरम्यान येत असल्यामुळे सीमावर्ती भागात मुख्यत: पूर आणि पूर येण्याबाबत अनेक समस्या आहेत. या समस्याच भारत नेपाळच्या संघर्षाचे कारण बनल्या या संघर्षाचे संबंध सहकार्यात परावर्तीत करण्यासाठी या देशांनी शारदा करार (१९२०) कोसी करार (१९५४) गंडक करार (१९५९) ,आणि महाकाली करार (१९९६) हे महत्त्वपूर्ण करार केलेले आहेत. मात्र हे करार परस्पर सहकार्य, हितसंबंधाऐवजी जलवर्चस्वामूळे झाले आहेत.त्यामुळे या दोन देशात पाण्यासाठी संघर्ष झालेला दिसून येतो. भारत आणि चीनचे संबंध पाण्यासंदर्भात ताणलेले व गुंतागुतीचे आहेत.चीनने अनेकदा भारताच्या हिताच्या विरोधात खेळ केला आहे चीन हे वरच्या नदीचे प्रदेश आहे तिबेटच्या पठारावरून भारत,बांगलादेश आणि दक्षिण-पूर्व आशियायी देशामध्ये चीनमधून पाणी वाहते चीन अप्रत्यक्षपणे पाण्याच्या प्रवाहवर नियत्रण ठेवते. ब्रम्हपुत्रा आणि तिच्या उपनद्यामध्ये पाण्याचा प्रवाह कमी झाल्यामुळे भारत आणि बांगलादेशात उन्हाळ्यात दुष्काळ तर पावसाळ्यात चीनने पाणी सोडल्यानंतर मोठा पूर येतो. त्यामुळे चीन भारतासोबत पाण्याबाबतीत कुटीलराजनीती करताना दिसतो. भारत बांगलादेश मध्ये तीस्ता नदीच्या पाणी वाटपावरून नेहमी तणाव व संघर्षाची स्थिती राहिली आहे. भारताने (१९९६) मध्ये बांगलादेश सोबत पाणी वाटपाचा करार केला असला तरी तीस्ता पाणी वाटपाचे


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

संकंट सोपे राहिले नाही. एकंदरीत भारत आणि शेजारील देशामध्ये पाण्यासाठी कुरघोडी संघर्ष होताना दिसतात हे स्पष्ट होते.

**महाराष्ट्र आणि शेजारील राज्यातील पाणी संघर्ष**

कृष्णा नदीच्या पाणीवाटपावरून महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेश राज्यात संघर्ष होतो. कृष्णा नदी पूर्वेला वाहणारी नदी आहे. तिचा उगम महाबळेश्वर येथे होऊन ती बंगालच्या उपसागरात विलीन होते. तिच्या उपनद्यासह एक विशाल खोरे बनते. महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेश या राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी ३३% क्षेत्र या नदीने व्यापले आहे. तीन राज्यात पाण्याचा वापर किती प्रमाणात व्हावा यासाठी न्या.बच्छावत यांच्या अध्यक्षतेखाली एक लवाद नेमण्यात आला होता. त्याचा निकाल डिसेंबर (१९७३) मध्ये लागून अंध्राला २३ घ.मी. व महाराष्ट्राला सु.१६ घ.मी.पाणी वापराचा हक्क मिळाला होता. तरीही राज्यातील संघर्ष थांबत नाहीत नर्मदा नदीच्या पाण्याचा संबंध मध्येप्रदेश, गुजरात राज्यस्थान आणि महाराष्ट्र या चार राज्याशी येतो. या नदीच्या पाणी वाटपासंबंधी इ.स.१९६९ मध्ये लवादाची नेमणूक करण्यात आली होती. या लवादाने चार राज्याची पाणी वाटपावरील मालकी सिद्ध करीत (१९७९) मध्ये निकाल दिला.या चारही राज्यांना तिच्या अधिग्रहीत क्षेत्रानुसार पाणी वाटप करण्याचा निर्णय घेण्यात नर्मदा नदीचा अल्पभाग महाराष्ट्रात समाविष्ट असला तरी मध्येप्रदेश व गुजरात राज्यात या नदीच्या पाणी वाटपासंदर्भात तंटा आहे. महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्याच्या त्रिंबकेश्वरला उगम पावणारी गोदावरी नदी बंगालच्या खाडीमध्ये पोहचते. महाराष्ट्र, मध्यप्रदेश छत्तीसगड आणि आंध्रप्रदेश मध्ये पाणी वाटपावरून होणाऱ्या तंट्यामुळे इ.स. १९६९ साली लवादाची स्थापना करण्यात आली.या लवादाने १९८० मध्ये आपला निकाल दिला. या निकालानुसार महाराष्ट्रच्या वाट्याला ४९% मध्येप्रदेशच्या वाट्याला २०% पाणी छत्तिसगड व आंध्रप्रदेशला काही प्रमाणात पाणी देण्यात आले तरीही आंध्रप्रदेश कडून गोदावरीच्या पाण्यासंदर्भात कायम तक्रार केली जाते.

**महाराष्ट्र व आंध्रप्रदेश करार**

गोदावरी खोऱ्यातील पोचमपाड धरणाच्या वरील भागातील गोदावरीच्या पाण्याच्या वापरासंबंधी ६ आक्टोबर १९७५ रोजी महाराष्ट्र व आंध्रप्रदेश यांच्यात एक करार झाला होता.या करारामुळे प्रत्यक्ष पाणी वापरावर खालील प्रमाणे निर्बंध आहेत.

| अ. क्र. | खोरे | पाणीवापर मुभा |
|---|---|---|
| १ | पैठण धरण स्थळापर्यंत-१ खोरे अशंत:व-२ खोरे पूर्ण | उपलब्ध असलेले १०० % पाणी |
| २ | पूर्णा जी -३ खोरे सिद्धेश्वर धरण स्थळापर्यंत | उपलब्ध असलेले १०० % पाणी |
| ३ | मांजरा -४ उपखोरे निझामसागर | ३० अ.घ.फु |
| ४ | पैठण,सिद्धेश्वर आणि निझाम सागराच्या खाली भागात | १०२ अ.घ.फू |

न्या. बच्छावत लवादाने सुचविलेल्या उपाययोजनांचा टाकलेल्या निर्बंधाचा मोठा परिणाम प्रत्यक्षात मराठवाडा विभागावरच विपरीत परिणाम झाला. पैठण व सिद्धेश्वर धरणाच्या वरील बाजूस उपलब्ध असणारे सर्व पाणी वापराची परवानगी देण्यात आली. मात्र दोन्ही धरणाच्या खालील बाजूस उपलब्ध मराठवाडा विभागात एकूण १७८ अ.घ.फु.पाणी उपलब्ध असताना फक्त १३२ अ.घ.फु.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

वापराचीच परवानगी मराठवाड्यास देण्यात आली.मुळातच मराठवाडा विभाग हा पाणी टंचाईचा व अवर्षणप्रवण क्षेत्राचा प्रदेश असल्यामुळे या भागातील सर्व पाणी वापराची परवानगी देणे आवश्यक आहे.पण निवाड्याने मराठवाड्याला त्याच्या भागात उपलब्ध असलेल्या ४६ अ.घ.फु.पाण्याचा वापर करता येत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली. बच्छावत लवादाने टाकलेले निर्बंध मराठवाड्याच्या विकासास मारक ठरतील असे दिसून येते.

**मराठवाड्याची भौगोलिक रचना आणि पाणी प्रश्न**

मराठवाड्याच्या उत्तरेस जळगाव,बुलढाणा हे जिल्हे आहेत पश्चिमेला नाशिक अहमदनगर, दक्षिणेला सोलापूर आणि कर्नाटक राज्यातील गुलबर्गा, बिदर हे जिल्हे आहेत तर पूर्वेला आंध्रप्रदेश राज्यातील कामारेड्डी, निजामाबाद व आदिलाबाद व महाराष्ट्तील यवतमाळ व आकोला हे जिल्हे आहेत. मराठवाड्याचा प्रदेश मुख्यत: काळया बेसाल्ट खडकाचा बनलेला आहे. मराठवाड्याचे पठार समुद्रसपाठी पासून सरासरी ३८१ मी उंचीवर आहे. प्राकृतिकदृष्ट्या मराठवाड्याचे दोन भाग पडतात. ईशान्य आणि पूर्वेकडील पठार, नैऋत्य व दक्षिण भागातील सखल प्रदेश, पर्वताची तिसरी रांग औरंगाबाद आणि बीड जिल्ह्याच्या पठार व सखल प्रदेशात प्रवेश करते. बालाघाट, जालना व अंजीठ्याचा डोंगर या भागातील प्रसिद्ध डोंगर आहेत. मराठवाड्याच्या भूशास्त्रीय रचणेप्रमाणे खडकात फार खोलवर पाणी मुरण्याची शक्यता नाही. या भागात नेहमीच पाण्याची मोठ्या प्रमाणात दुर्मिळता व दुर्भिक्ष जाणवू लागले आहे. इ. स. २०१९ मध्ये मराठवाड्यात पाणी टंचाईमुळे २९ लाख ७२ हजार ५५२ लोंकाची तहान १७९६ टँकरवर अवलंबून होती. या भागातील पाणी समस्येला नैसर्गिक घटक काही प्रमाणात कारणीभूत असला तरी, राजकीय घटक अधिक प्रमाणात कारणीभूत असल्याचे चित्र आहे. मराठवाडा भागातील पाणी समस्येने भयंकर स्वरूप धारण करीत असल्याने या भागातील पाण्याचा प्रश्न नेहमीच राजकीय केंद्रस्थानी राहिला आहे.

**नांदेड जिल्ह्यातील बाभळी बंधाऱ्याचा पाणी प्रश्न**

नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय दिशेस वसलेला असून या जिल्ह्याच्या सीमा आंध्रप्रदेश,व कर्नाटक राज्याला लागून आहेत. जिल्ह्यातील गोदावरी ही प्रमुख नदी असून नांदेडच्या विकासात या नदीचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे दिसून येते. जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८६० ते १९५५ एवढा असून रेखावृतीय विस्तार ७६५६ ते ७८१९ असा आहे. जिल्ह्याच्या पश्चिमेस परभणी, लातूर, उस्मनाबाद व उत्तरेस यवतमाळ आहे, दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा आहे. पूर्वेस आंध्रप्रदेश राज्यातील निजामाबाद व आदिलाबाद हे जिल्हे आहेत. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १०५२८ चौ.कि.मी.असून महाराष्ट्राच्या एकूण भूभागापैकी ३.४१% भूभाग नांदेड जिल्ह्याने व्यापला आहे. दखनच्या पठारावरती वसलेला हा जिल्हा सखल व सुपीक मातीचा आहे.या जिल्ह्याची निर्मिती १ मे १९६२ रोजी झाली असून सध्या या जिल्ह्यात सोळा तालुके आहेत. यातील एक धर्माबाद तालुका आहे. या तालुक्याच्या सरहद्दीवर बाभळी बंधारा आहे. या बाभळी बंधाऱ्याच्या पाण्यावरून नांदेड जिल्ह्यातील स्थानिक लोक व महाराष्ट्र राज्यातील नेतृत्वाचे आणि आंध्र प्रदेश राज्यातील स्थानिक लोक आणि नेतृत्वाचे नेहमीच खटके उडाले आहेत. या बाभळी बंधा-याचा प्रश्न नांदेड जिल्हा व आंध्र प्रदेश राज्यातील स्थानिक लोकापुरता मर्यादित


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

न राहता तो विधिमंडळ, संसद व सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला असल्यामुळे बाभळी बंधारा राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे.

**बाभळी बंधारा पाणी वाटप**

बाभळी बंधाऱ्याचे दोन राज्यातील पाणी वाटप, पाण्याचे योग्य व्यवस्थापण करण्यासाठी त्रिसद्सीय समिती नेमण्यात आली होती. या समितीने बाभळी बंधाऱ्याच्या पाण्यासंदर्भात काही अटी सांगितल्या त्या म्हणजे महाराष्ट्राचा बाभळी बंधाऱ्यातील (२.७४) अब्ज घ.फु.पाणी वापर लवादाने दिलेल्या ६० अब्ज घ.फु.अंतर्गत राहील. बाभळी बंधाऱ्याचे दरवाजे १ जुलै ते अक्टोबर पर्यत उघडे राहतील. गोदावरी नदीतून पाणी वाहण्यास बंधाऱ्यामुळे कसलीही अडचण होणार नाही. दरवर्षी २९ सप्टेबर ते ३० जून या काळात बाभळी बंधाऱ्यातून होणारा पाणी वापर (२.७४) अब्ज घ.फु.जास्त होणार नाही तसेच एकूण साठ्यापैकी (०.६)अब्ज घ.फु.पाणीसाठा सामासिक राहील. महाराष्ट्रराज्य १ मार्चला आंध्रप्रदेशसाठी खालील बाजूस गोदावरीत पाणी सोडेल. महाराष्ट्रराज्य बाभळी बंधाऱ्यातील (२.७४) अब्ज घ.फु.पाण्याचा वापर वांरवार करणार नाही. हा निकाल महाराष्ट्रासाठी अडचणी वाढविणारा असून मराठवाडा व नांदेड विभागात उन्हाळयात पाणी टंचाईची समस्या असताना पाणी पोचमपाड धरणात सोडणे मान्य होणारे नसून ते महाराष्ट्राच्या हिताचे नाही. मात्र पाण्यापासून होणाऱ्या राजकीय संघर्षाला पूर्णविराम देण्याचा हा प्रयत्न आहे असे म्हणता येईल.

**बाभळी बंधाऱ्याची गरज**

नांदेड जिल्ह्यातील विष्णुपुरी धरणापासून ते आंध्रप्रदेश सीमेलगत असलेल्या बाभळी बंधाऱ्यापर्यतचे अंतर ९७ कि.मी.आहे. हा ९७ कि.मी.भाग पाणी टंचाईने ग्रासला होता.या भागातील लोकांनी बाभळीला मोठा बंधारा व्हावा स्थानिक लोकांचे पाण्यासाठी होणारे हाल थांबावेत, म्हणून प्रखर संघर्ष केला होता. संघर्षाचा परिणाम म्हणजे इ.स.१९९५ साली बाभळी बंधाऱ्याला मान्यता मिळाली. विष्णुपुरी ते धर्माबाद या ९७ कि.मी. अंतरात एकही साठवण बंधारा नसल्याने याला मान्यता मिळाली नांदेड तालुक्यासह लोहा ,कंधार, मुदखेड, उमरी, धर्माबाद, नायगाव, बिलोली या तालुक्यासह कृष्णूरच्या एमआयडीसीचा समावेश आहे, त्यामुळे बाभळी बंधारा नांदेड जिल्ह्याच्या दक्षिणेकडील तालुक्यातील लोंकाची तहान भागविण्यासाठी,शेती व उद्योगासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून स्थानिक लोंकाच्या विकासाचा रस्ता मोकळा करणारा आहे.

**आंध्रप्रदेश व महाराष्ट्रातील राजकीय संघर्ष**

पोचमपाड धरणाच्या प्रश्नावरून आंध्रप्रदेशने बाभळीचे काम थांबविण्यासाठी आडकाठी केला होती. मात्र २००६ ते २००७ पर्यत झालेल्या सुनावणीत तब्बल पाच वेळा बाभळी बंधाऱ्याचे बांधकाम बंद पाडण्यासाठी आंध्रप्रदेशने केलेल्या मागण्या न्यायालयाने फेटाळून लावल्या आणि २६ एप्रिल २००७ रोजी बाभळी बंधाऱ्याचे काम सुरु ठेवावे अशी मंजुरी न्यायालयाने दिली. महाराष्ट्राने २००६ मध्ये आंध्रप्रदेशला सात टीएमसी पाणी देण्याचे लेखी अश्वासन देऊनही आंध्रप्रदेशने ते मान्य केले नाही. इ.स. २०१० मध्ये १५ ते १९ जुलै दरम्यान बाभळी बंधाऱ्यावर आंध्रप्रदेश चे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी त्यांच्या समर्थकासह न्यायालयाचे आदेश झुगारून बेकायदेशीर रित्या महाराष्ट्रात प्रवेश केला.त्यांच्या या कृत्यामुळे महाराष्ट्र टीम विशेषतः नांदेड जिल्ह्यातील जनता संतापली होती.संपूर्ण नांदेड जिल्ह्यात बंद


Copyright © | JET Network, All Rights Reserved

पुकारण्यात आला होता. महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्ष एकत्र येऊन २०१० रोजी महाराष्ट्र विधिमंडळ अधिवेशनात चंद्राबाबू नायडू यांच्या विरोधात ठराव मांडला होता. सर्वोच न्यायालयाने महाराष्ट्राच्या बाजूने निकाल दिला होता या निकालामुळे दक्षिणेकडील २० हजार एकरचा व ५० गावच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न मिटला असला तरी दोन राज्यातील धुसफूस थांबली असे म्हणता येत नाही, बंधाऱ्याच्या पाण्यासाठी आंध्रप्रदेश नेहमीच महाराष्ट्रावर कुरघोडी करत महाराष्ट्र विशेषतः नांदेड जिल्ह्यातील लोकांना वेठीस धरत असते.

**सारांश**

पाणी हे माणसाची मुलभूत गरज आहे. माणूस आपली मुलभूत गरज भागविताना पाण्यासाठी संघर्ष करतो, हे वास्तव नाकारता येत नाही. देशातंर्गत,राज्य व प्रदेशाच्या सीमा निश्चितीने पाणी हे संघर्षाचे कारण बनले आहे. हा प्रश्न राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे.पाण्यावरून राजकारण केले जात आहे. नांदेड जिल्ह्यातील बाभळी बंधाऱ्याच्या पाणी वाटपावरून महाराष्ट्र व आंध्रप्रदेशमध्ये राजकीय संघर्ष झाला आहे. बाभळी बंधाऱ्याचे पाणी नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद व शेजारील तालुक्यातील लोकांची तहान भागविण्यासाठी आणि शेतीसाठी महत्त्वाचे असताना आंध्रप्रदेश कडून बंधाऱ्याचे काम अडविणे,कुरघोडी करणे या कारणास्तव हा प्रश्न राजकीय केंद्रस्थानी जाऊन संघर्षाचे कारण बनला हे सत्य नाकारता येत नाही.

**संदर्भसूची**

१. चितळे माधवराव,पाणी व्यवस्थापण' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र,सिंचन साधना प्रकाशन, औरंगाबाद,(२७ ते २८ सप्टेंबर २०१६)
२. www.https://waponline .com
३. www.https://the diplomat.com
४. https://www .bbc .com
५. सूर्यवंशी किशोर श्यामराव, महाराष्ट्रातील पाणी प्रश्नाचे राजकारण व मराठवाड्याचा विकास,पीएच.डी शोधप्रबंध डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.
६. देगलूरकर,गो.व.मराठवाडा ,समाविष्ट:मराठी विश्वकोश खंड १२, मुंबई;मराठी विश्वकोश मंडळ.१९७६
७. सकाळ अग्रोवान,प्रादेशिक -पान (२३ मार्च २०१९)
८. सवदी कोळेकर: प्राकृतिक व प्रायोगिक भूगोल.
९. https://www. Prahar.in


Copyright © | JET Network, All Rights Reserved